मोठ्या इमारती, गाड्या, हॉटेल्स आणि घरामध्ये इलेक्ट्रोनिक वस्तूंची रेलचेल असे चित्र तयार झाले. एका बाजूला शहरांमधील लोकसंख्या जलद गतीने वाढत गेली, गावातून लोकांचे लोंढेच्या लोंढे शहरात यायला सुरुवात झाली, शहरामध्ये झोपडपट्ट्या वाढल्या, शहरे बकाल झाली. मुंबई ला जर तुम्ही कधी लोकलने प्रवास केलात किंवा पुण्यात पर्वतीवर जाऊन खाली एखादी नजर टाकलीत तर तुम्हाला याची चांगली कल्पना येईल. भारतातील सर्व मोठ्या शहरात हेच चित्र आज उभे आहे. या शहरांमध्ये नागरी सुविधांवर प्रचंड ताण येत आहे, वाहनांची गर्दी, कचरा, नद्यांचे आणि हवेचे प्रदूषण, पाण्याचा गैरवापर यामुळे शहरांमध्ये वेगळे प्रश्न निर्माण होत आहेत.

- शासकीय कर्मचाऱ्यांचे पगार, भ्रष्टाचार आणि बाजारातील महागाई ही दिवसेंदिवस वाढतच आहे. राज्यात आणि देशात बरीच सरकारे आली आणि गेली पण परिस्थती मध्ये फार काही फरक पडला नाही. या सगळ्याचा एकत्रित परिणाम म्हणजे समाजातील काही मोजकी माणसे या सगळ्या प्रवाहात श्रीमंत झाली – यामध्ये प्रामुख्याने व्यापारी वर्ग, शासकीय कर्मचारी, राजकारणी, मोठे शेतकरी, माहिती–तंत्रज्ञान किंवा औद्योगिक क्षेत्रातील कर्मचारी यांचा समावेश करता येवू शकतो
- पण हा वर्ग आपल्या एकूण लोकसंखेच्या मानाने खूपच नगण्य आहे. अगदी ३–४ % एवढाच आहे. याचा अर्थ असा होतो कि देशातील ९०–९५ % जनता आजही त्यांच्या मुलभूत गरजा पूर्ण करण्या करता झगडत आहे. हा आकडा आपण ग्रामीण भारताच्या बाजूने बघितला तर ६०–७०% लोक आजही ग्रामीण भागात राहतात आणि त्यांचा या आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकात प्रामुख्याने समावेश होतो.आज एका बाजूला २७ मजल्यांच्या घरात राहणारेही भारतात आहेत आणि २७,००० रुपयांच्या कर्जासाठी आत्महत्येचा विचार करणारेही भारतात आहेत.
- ही झाली आर्थिक विषमता, दुसऱ्या बाजूला आपण या अवास्तव शहरीकरणात आणि संपूर्ण रासायनिक शेतीचा मार्ग स्वीकारून निसर्गाचा एवढा ऱ्हास केला आहे कि आपल्या पुढच्या पिढीला नद्या, झाडे आणि प्राणी–पक्षी फक्त संग्रहालयात पाहायला मिळतील अशी परिस्थिती हळू हळू येत आहे.